# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे. -४११ ००१.
(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

Website : http//:barti.maharashtra.gov.in

## महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा परीक्षा-२०२३ या परीक्षेसाठी नि:शुल्क,अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) साठी अर्ज मागविण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा परीक्षा-२०२३ नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) खालील नमूद केलेल्या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी संबंधित प्रशिक्षण केंद्राशी संपर्क साधून त्या केंद्राकडे अर्ज करावा.

पात्र युवक-युवतींना https://barti.maharashtra.gov.in या वेब साईटवरून 'Notice Board' च्या सदराखाली महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा परीक्षा-२०२३/MPSC-२०२३ लिंकवरून अर्ज डाऊन लोड करून किंवा खालील नमुद प्रशिक्षण केंद्राच्या कार्यालयातून प्राप्त करून नमूद केंद्राकडे **दि.३१/१२/२०२२** पर्यंत परिपूर्ण भरलेला अर्ज कागदपत्रांसह सादर करावा.

| अ.क्र. | महसूल विभाग | प्रशिक्षण संस्थेचे नाव / पत्ता / दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | औरंगाबाद | संबोधी अकादमी संचलित संबोधी स्पर्धा प्रशिक्षण केंद्र, ३ रा मजला,सी बिल्डिंग,निर्माण भारती सिटी सेंटर,शासकीय ग्रंथालया समोर, निराला बाजार,औरंगाबाद,मोबाईल क्र.७०२०९५१६५०/८३०८१६१९२९/७५०७७४३३२२ |

उपरोक्त प्रशिक्षण केंद्रामध्ये **२००** अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.(सकाळच्या सत्रातील १०० विद्यार्थ्यांची एक बॅच व दुपारच्या सत्रातील १०० विद्यार्थ्यांची दुसरी बॅच याप्रमाणे) त्यामध्ये ३० टक्के जागा महिलांसाठी, ४ टक्के जागा **'दिव्यांग' असलेल्या व्यक्तींसाठी (Person With Disability)**, ५ % जागा अनुसूचित जाती अंतर्गत वंचित जाती मधील ( वाल्मिकी व तत्सम जाती-होलार,बेरड,मातंग,मांग,मादगी, ई.) विद्यार्थ्यांकरिता आरक्षित असतील,एकूण जागांच्या ५ % जागा विशेष बाब म्हणून राखीव ठेवण्यात येईल.

**पात्रता :-**

१) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसुचित जातीचा दाखला व अधिवास असावा.
२) अर्जदार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.
३) अर्जदाराचे वय महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवेच्या अटी व शर्ती नुसार असावे.
४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांस बसणेसाठी पात्र असावा.
५) उमेदवारांनी अर्ज करताना उत्पन्नांचा दाखला जोडावा.

**विद्यार्थी निवडीचे निकष:-**

- प्रशिक्षणातील सर्व जागांसाठी प्राधान्याने गुणवत्ता यादीतील रु.८ लाखापर्यंत उत्पन्न मर्यादा असलेल्या सर्व पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :-**

१) वर नमुद प्रशिक्षण केंद्रांकडे अर्ज दाखल करण्याची **शेवटची तारीख ३१/१२/२०२२**
२) **प्रशिक्षण कालावधी १२ महिन्यांचा राहील.**
३) विहीत नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रांसहीत अर्ज दाखल केलेल्या पात्र उमेदवारांची चाळणी परीक्षा (MPSC CET-2023) वर नमुद संस्थेमार्फत **दि.१५ जानेवारी २०२३** रोजी घेण्यात येईल. उमेदवारांची गुणानुक्रमे प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येईल.
४) निवड झालेल्यापैकी पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दरम्यान रोज ४ तास व त्यापेक्षा जास्त कालावधीचे प्रशिक्षण देण्यात येईल. तसेच एकूण दरमहा ८० टक्के पेक्षा जास्त कालावधी प्रशिक्षणास उपस्थित राहील त्या विद्यार्थ्यांना दरमहा रुपये ९०००/- विद्यावेतन देण्यात येईल.
५) विद्यार्थ्यांना टेस्ट सिरीज (ऑनलाईन/ऑफलाईन) व विशेष शैक्षणिक साहित्य व पुस्तके यासाठी प्रशिक्षण संस्थेला बार्टी मार्फत प्रती विद्यार्थी रक्कम रु.२५०००/- देण्यात येईल..
६) प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतीही शासकीय/निमशासकीय खाजगी नोकरी अथवा व्यवसाय करता येणार नाही.
७) ज्या उमेदवारांनी यापूर्वी बार्टी,पुणे मार्फत (MPSC) महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण व UPSC नागरी सेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण यापूर्वी घेतले असेल त्यांची पुन्हा नव्याने प्रशिक्षणासाठी निवड केली जाणार नाही.
८) सदर योजनेबाबत/प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेच प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतचे अंतिम सर्व अधिकार मा.महासंचालक,बार्टी तसेच शासनास राहतील.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१) उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो.
२) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत,उत्पनाचे प्रमाणपत्र व अधिवासी प्रमाणपत्र साक्षांकित प्रत.
३) कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण केलेल्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती.
४) शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत.(Birth Certificate)
५) उमेदवाराचे आधार कार्ड छायांकित प्रत.

Adv/ /२०२२/

**(धम्मज्योती गजभिये)**
**महासंचालक, बार्टी, पुणे.**

Scanned with CamScanner

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग — राज्यसेवा परीक्षा पुर्व प्रशिक्षण

## विहीत नमुना अर्ज

फोटो

१. **संपूर्ण नाव** :- ------------------------------------------------------------------------

(आडनाव) (नांव) (वडील/ पतीचे नाव)

२. **लिंग ( पुरुष/ स्त्री )** :-

३. **जन्मतारीख** :- ------/ ----- /---------

४. **अनुसूचित जाती** :- होय / नाही **जात :-** ------------------------

५. **पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता** :- ------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

६. **कायमचा पत्ता** :- ------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

७. **दूरध्वनी / मोबाईल क्रमांक** :-

८. **आधार क्रमांक** :-

९. **ई— मेल** :-

१०. **पदवी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका** :- ---------------------------

११. **दिव्यांग व्यक्ती**
**(Person with Disability)** :- होय/नाही (होय असल्यास तपशील द्यावा)

१२. **रहिवासी दाखला** :-

१३. **कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. (उत्पन्नाचा दाखला)** :-

**ठिकाण:-**

**दिनांक.**

**उमेदवारांची स्वाक्षरी**

( )

**उमेदवाराचे नाव**

**टिप:-** उमेदवारांना प्रशिक्षण घ्यावयाचे आहे त्या उमेदवारांनी केंद्रावर दि.३१/१२/२०२२ पर्यंत परिपूर्ण भरलेला अर्ज प्रत्यक्षात कागद पत्रांसह सादर करावा.

Scanned with CamScanner